# प्रो. राईल आणि बर्ट्रांड रसेल

प्रो. राईल यांच्या 'Concept of mind' या पुस्तकाने तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात निश्चितच एक खळबळ उडवून दिली होती. तत्त्वज्ञानात कित्येक वर्षापासून 'मन-शरीर' संबंधाबाबत अनेक मतमतांतरे, अनेक समस्या त्यांच्या अस्तित्वासंबंधी, स्वरूपासंबंधी आणि परस्परसंबंधासंबंधी निर्माण झाल्या होत्या. 'मन' नावाची एक शरीरापेक्षा अत्यंत वेगळी वस्तू डेकार्टने आपल्या संशय-पद्धतीद्वारा निर्विवादपणे सिद्ध केल्याचा दावा केला होता. व तेव्हापासून या परस्परभिन्न तत्त्वांच्या सदंर्भात हजारो पाने तत्त्ववेत्त्यांनी खर्ची घातली होती. प्रो. राईल यांनी या 'मनाला' चक्क 'Ghost in the machine' अशी संज्ञा देऊन या मनरूपी भूताने तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात केवढा धुमाकूळ घातला आहे हे दर्शवून दिले. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात फक्त एका तत्त्वाच्या आधाराने केलेले विवरण जसे काही समस्या निर्माण करते तसेच परस्पर विरोधी दोन तत्त्वे स्वीकारल्यामुळेसुद्धा दुसऱ्या प्रकारच्या समस्या निर्माण होतात. त्या टाळण्यासाठी एका अभिनव पद्धतीने त्या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न मालब्रांच, लाईब्निझ, बर्कले, हेगेल आणि विल्यम जेम्स वगैरे अनेकांनी केला आहे. कोर्टेशिअन कोटकोर द्वैतवाद पारंपरिक स्वरूपात अलीकडे कोणीच स्वीकारीत नाही. असे असले तरी राईल यांचे म्हणणे आहे की, वरील सर्व विचारवंतांनी शब्दांमधून द्वैतवाद नाकारला असला तरी त्यांच्या कित्येक समजुतींचा तार्किक संबंध कार्टेशिअन द्वैतवादाशी आहे.. आणि याच मुद्द्यावर रसेल यांचा राईलशी मतभेद आहे. जो आरोप ते इतर तत्त्ववेत्त्यांवर करीत आहेत नेमका तोच आरोप राईलबाबतही उपस्थित होऊ शकतो असे रसेल यांचे म्हणणे आहे.

My philosophical Development या पुस्तकात रसेल यांनी शेवटी 'Some Replies to Criticism' नावाचे प्रकरण लिहिले आहे त्यात 'What is mind ?' या शीर्षकांतर्गत लिहिलेल्या लेखात राईलच्या 'Conept of mind' या पुस्तकातील अनेक विसंगती त्यांनी दर्शवून दिल्या आहेत. रसेल म्हणतात

की राईल यांचे म्हणणे थोडक्यात खालीलप्रमाणे मांडता येईल. 'मानसिक' हे विशेषण कोणत्याही विशेष अशा पदार्थाला लागू पडत नाही. ज्यांना आपण 'मानसिक' अशी संज्ञा देऊ शकणार नाही अशा काही मूलद्रव्यांच्या संरचनांना आणि प्रवृत्तींना आपण 'मानसिक' अशी संज्ञा देतो (The adjective 'mental' is not applicable to any special kind of 'stuff', but only to centain organizations and dispositions illustrated by patterns composed of elements which it is not significant to call 'mental') राईल यांनी यासाठी 'क्रिकेट' चे उदाहरण दिले आहे. 'क्रिकेट' ही काही खेळाडू, काही वस्तू काही सामने यांच्यापेक्षा 'वेगळी' वस्तू नाही. या सर्वांच्या संघाताला दिलेले ते नाव असल्यामुळे ते तार्किक दृष्टीने वरच्या स्तरावरील नाव आहे एवढाच त्याचा अर्थ होतो. 'ब्रिटिश घटना' हे नाव संसदेची दोन्ही सभागृहे, न्यायमंदिरे, डाऊनिंग रस्ता आणि बकिंमहॅम पॅलेस या सर्वांच्या संघाताला दिलेले नाव होय. ब्रिटिश घटना नामक कोणतीही मूर्त वस्तू अस्तित्वात नाही. याच धर्तीवर 'मानसिक' या नावाने आपण ज्यांचे वर्णन करतो त्यांना भौतिक घटितांव्यतिरिक वेगळी दर्जा असू शकत नाही. Ryle म्हणतात, "To talk of a person's mind is not to talk of a repository which is permitted to house objects... It is to talk of the person's abilities, liabilities and inclinations to do and undergo certain sorts of things" मनासंबंधी बोलणे म्हणजे व्यक्तीच्या क्षमता, जबाबदाऱ्या, वृत्ती या संबंधी बोलणे होय. ज्यात या गोष्टी राहतात अशा 'मन' नामक वस्तूसंबंधी बोलणे नव्हे.

रसेल यांना या सर्व प्रतिपादनाबाबत असमाधान आहे. त्यांनी म्हटले आहे की राईल यांचे आवडते विशेषण ठिसूळ (brittle) हे आहे. त्याचा अर्थ राईल असा करतात की, 'योग्य परिस्थिती येताच ठिसूळ वस्तूंचे तुकडे होतील' याच धर्तीवर एखादी व्यक्ती सध्या झोपली असली तरी आपण तिला 'बुद्धिमान' आहे असे म्हणतो याचा अर्थ राईल असा करतात की योग्य परिस्थिती येताच ती व्यक्ती बुद्धिमत्ता दर्शवील. परंतु रसेल यांचा मुख्य आक्षेप हा आहे की, सामान्य माणूस कोणत्या कारणांनी ठिसूळ हा भौतिक धर्म आहे आणि 'बुद्धिमान' मानसिक धर्म आहे असा फरक करतो ते स्पष्ट करण्याची राईल यांना मुळीच आवश्यकता वाटत नाही. सामान्य माणूस सहजच म्हणेल की, 'ठिसूळपणा' हा भौतिक

पदार्थाचा धर्म आहे तर 'बुद्धिमत्ता' हा मानसिक पदार्थाचा धर्म आहे. म्हणजेच ही दोन विशेषणे दोन भिन्न प्रकृतीच्या पदार्थांना (Stuff) लागू केली जातात. आणि या ठिकाणी राईल सपशेल मौन पाळतात.

रसेल यांनी राईलविरुद्ध अजून एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. राईल यांचे म्हणणे असे आहे की, एखाद्या वाळवंटात एखादी व्यक्ती एकटीच आहे आणि प्रचंड गडगडाट झालेला तिने ऐकला, तो ऐकण्यासाठी तिच्याशिवाय, अन्य व्यक्ती उपस्थित नसेल तर तो आवाज त्या व्यक्तीचा अत्यंत खाजगी अनुभव राहील. परंतु अशी परिस्थिती अपवादभूत, अपघातात्मक राहील. परंतु एरवी एखादी व्यक्ती स्वतःसंबंधी जे जाणते ते इतरांना तिने सांगितल्याशिवाय कळू शकत नाही ही गोष्ट राईल यांनी सपशेल नाकारली आहे व या गोष्टीचे रसेल यांना आश्चर्य वाटते. ते या संदर्भात 'स्वप्ना' संबंधी बोलतात. सर्वसामान्यपणे हे मान्य होण्यात काहीच अडचण नाही की, एका व्यक्तीने आपल्याला पडलेले 'स्वप्न' दुसऱ्याला सांगितल्याशिवाय त्याला ते कळू शकत नाही. परंतु रसेल म्हणतात राईल स्वप्नासंबंधी काहीही सांगत नाहीत. काही ठिकाणी राईल यांनी फ्राईड यांची अवाजवी स्तुती केली असली तरी फ्राईड यांच्या अत्यंत महत्त्वाच्या ठरलेल्या स्वप्नमीमांसेबाबत ते उल्लेखही करीत नाहीत. 'पोटदुखी' 'दातदुखी' सारखी दुःखे व्यक्तीच्या बाह्य हालचाली व अभिव्यक्तीद्वारा कशी दुसऱ्यांना कळतात याचाच फक्त ते उल्लेख करतात

राईल यांच्या 'Imaginations' या प्रकरणावरही रसेल यांचे गंभीर आरोप आहेत. राईल म्हणतात की, आपल्या कल्पना काही मनःशक्तीद्वारा निर्माण होतात असे म्हटले जाते. परंतु कल्पित वस्तू कुठेच अस्तित्वाच नसते. वरवर विचार करता राईल यांचे प्रतिपादन बरोबर वाटते. उदा. मी माझे डोळे बंद करून 'घोड्याची कल्पना' केली तरी प्रत्यक्ष खोलीत घोडा अस्तित्वात नसतो. परंतु रसेल म्हणतात की, 'घोड्याची कल्पना' करणे आणि 'हिप्पोपोटॅमसची कल्पना' करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. या दोन कल्पना निर्माण होत असताना नेमकें काय घडत असावे ? राईल १६१ पानावर म्हणतात की मानसिक घटिते नावाची वस्तू अस्तित्वात नाही. अगदी साध्या सरळ (भाबड्या) वास्तववादानुसार (Naive Realism) राईल म्हणतात की, बाहेर घोडा असेल तर मी घोडा प्रत्यक्ष पाहतो. परंतु जेव्हा मी घोड्याची कल्पना करतो तेव्हा बाहेर कोणताही घोडा

नसतो. परंतु रसेल यांचे म्हणणे आहे की, 'घोड्याची कल्पना' हे घटित आणि 'हिप्पोपोटॅमसची कल्पना' हे घटित यांच्यात निश्चित भेद आहे.

सुखदुःखाच्या विवरणाबाबतही रसेल यांचे राईल यांच्याशी मतभेद आहेत. राईल म्हणतात सुखदुःखाच्या भावना व्यक्तीच्या बाह्य वर्तनावरून दुसऱ्यापर्यंत पोहोचतात. परंतु रसेल म्हणतात अशी कितीतरी उदाहरणे आपण देऊ शकू की, ज्या द्वारा व्यक्ती बाह्यतः आनंद व्यक्त करीत असली तरी अंतर्यामी ती कमालीची दुःखीकष्टी असू शकतो. रसेल म्हणतात सुखदुःखांच्या भावनांद्वारा खऱ्या अर्थाने भौतिक/मानसिक भेद अधोरेखित होऊन समोर येतो. 'बुद्धिमत्ता' या धर्मात ही शक्ती नाही. कारण आधुनिक जगातील गुंतागुंतीच्या यंत्रणा माणसापेक्षा अधिक बुद्धिमत्ता प्रदर्शित करू शकतात. पण म्हणून माणसांपेक्षा त्यांना मी झुकते माप देणार नाही. कारण निर्जीव यंत्रणा सुखदुःखाचा अनुभव घेऊ शकत नाही. या उलट जिवंत माणसाचे व्यवच्छेदक लक्षणच सुखदुःखाचा अनुभव घेणारा पदार्थ असे करता येईल.

राईल यांनी अंतर्निरीक्षण ज्ञानाचे साधन म्हणून नाकारले आहे व त्यामुळे ते वर्तनवादी परिवारात जाऊन मिसळले आहेत. परंतु ते या परिवारापासून स्वतःला थोडे वेगळे यासाठी समजतात की, वर्तनवादी सर्व गोष्टींचे यांत्रिक पद्धतीचे स्पष्टीकरण देतात व राईल मात्र स्वतःला यंत्रवादी समजत नाहीत. परंतु त्यासाठी ते कोणतेही ठोस स्पष्टीकरण देत नाहीत. विज्ञानाबाबतही राईल यांची भूमिका विचित्र आहे असे रसेल यांना वाटते. तत्त्ववेत्त्यांना विज्ञानाशी काहीही देणेघेणे नाही. सृष्टीसंबंधात तत्त्ववेत्त्यांची अगदी प्राचीन काळी असलेली मते असली तरी फारसे बिघडत नाही असे राईल यांना वाटते. किंबहुना त्यांनी शास्त्रज्ञांच्या अतिसुधारित तांत्रिक भाषेकडे लक्षच देऊ नये, असे म्हटले आहे. परंतु सामान्य माणसांना जे वाटते की विचार आणि कल्पना या कोणाच्यातरी 'डोक्यातून' निघतात अशा भाषेबाबत मात्र त्याने अतिशय सावध असावे असे म्हटले आहे. उदा. गोल्डस्मिथ म्हणतो

Still the wonder grew
That one small head could carry all he knew.

या ठिकाणी ही कल्पना नाकारण्यासाठी राईल कोणताही युक्तिवाद देत नाहीत आणि या ठिकाणी रसेलच्या मते राईल यांनी स्वतःला डेकार्टच्या द्वैतवादात

अडकवण्याची नकळत मुभाच देऊन टाकली आहे. कारण कल्पना/विचार हे कुठल्यातरी 'प्रदेशात' असतात असा भ्रम त्यांना डेकार्टप्रमाणेच झाला आहे. त्यांनी त्यांना संरचना (structure) म्हटले असले तरी काहीही 'मानसिक' असणे म्हणजे प्रदेशात असणे असे नव्हे. 'क्रिकेट' क्रिकेटच्या मैदानावर वस्तीला नसते किंवा 'हुषारी' हुषार लोकांच्या मध्ये 'असत' नाही.

याच धर्तीवर राईल यांनी 'रंगीत वस्तू पाहणे' याचे विश्लेषण केले असून ते संपूर्णपणे 'भाषिक' पातळीवर आणले आहे. परंतु रसेल म्हणतात की त्यामुळे महत्त्वाच्या वैज्ञानिक तथ्याकडे दुर्लक्ष झाले आहे. डेकार्टच्या मूलभूत द्वैतवादापासून सुटका होण्यासाठी (जी होणे, रसेलनुसार आवश्यकही होते.) प्रो. राईल यांनी मानसिक/भौतिक विशेषणांपैकी मानसिक विशेषणे, ज्यांना आपण भौतिक म्हणतो त्यापेक्षा वरच्या दर्जाची मानली आहेत. पुनः द्वैतवादी भूमिकेवरच आपण आहोत असा याचा अर्थ होतो. 'ठिसूळपणा' मानसिक विशेषण का नाही याचे कोणतेही स्पष्टीकरण राईल यांच्यापाशी नाही. रसेल यांच्या मतानुसार भौतिक मानसिक विशेषणांमध्ये मूलभूत काही भेद आहे असे नसून ज्या पद्धतीने त्यांच्यासंबंधाने आपणास ज्ञान प्राप्त होते त्यात भेद आहे. एखाद्या घटनेला मी मानसिक म्हणतो कारण कोणाच्या तरी 'निरीक्षणाचा' तो विषय असतो असे राईल म्हणतात. परंतु रसेल यांच्या मतानुसार तीच घटना पूर्णतः भौतिक असते. जर आपण वेगळ्या दृष्टिकोनातून तिच्याकडे पाहिले तर, राईल व रसेल यांच्यातील मतभेद केवळ 'भाषिक' आहेत असे वरवर विचार करता वाटेल. परंतु हे जग ज्या पद्धतीने घडले आहे त्यामध्ये आम्हा दोघांच्या विचारांमधील भेद दडला आहे असे रसेल म्हणतात. भाबड्या वास्तववादाची भलावण करण्याचा भरात राईल यांनी जणू विज्ञानापासून फारकतच घेतली आहे. परंतु तत्त्वज्ञाला जर गंभीरपणे काही करायचे असेल तर विभिन्न वैज्ञानिक तथ्ये त्याच्या आकलनात खोलवर रुजली पाहिजेत म्हणजेच एका नव्या पद्धतीने, नव्या संकल्पनांच्या साह्याने तो जगाचा अन्वय लावू शकेल.

वरील विवेचनावरून अलिकडील तत्त्ववेत्त्यांनी 'मानसिकतेचे निराकरण' (Elimination of Psychologism) करण्याचा जो चंग बांधला आहे तो मला अनाकलनीय वाटतो. आपल्या ज्ञानात अती काटेकोरपणा आणण्यासाठी आम्ही सूक्ष्मातिसूक्ष्म विश्लेषण करून आण्विक तथ्यांपर्यंत (atomic facts )

किंवा स्ट्रॉसन यांच्या bare particulas पर्यंत येऊन पोहोचलो तरी या सर्वांचे विश्लेषण, वर्गीकरण, स्पष्टीकरण करून त्यांचा परस्पर अन्वय लावून एका व्यवस्थेत बांधण्यासाठी जी प्रक्रिया करावी लागले ती पूर्णतः भौतिक राहू शकेल का ? किंबहुना भौतिक प्रक्रियेला विशिष्ट प्रयोजनानुसार कार्य करावे ही प्रेरणा तरी कशी व कोठून मिळणार ? संपूर्ण मानसिक विशेषणांची हकालपट्टी करण्याचा राईलचा मूर्त प्रयत्न Concept of mind या ग्रंथाच्या रूपाने आहे. परंतु पुनः तो विशिष्ट प्रयोजनानुसार केलेला प्रयत्न नव्हे काय ? असे प्रयोजन तथाकथित भौतिक घटितांना राहू शकते काय ? वगैरे प्रश्न तसेच अनुतरीत राहतात व तत्त्वज्ञानातील न सुटणाऱ्या कूटांपैकी मन-शरीर संबंधाचे कूट तत्त्ववेत्त्यांना येणाऱ्या आगामी वर्षांसाठी खाद्य पुरवीत राहणार याची मात्र खात्री पटते.

२५७, शंकर नगर,
नागपूर १०

**सौ. उषा गडकरी.**